क्र.मासं/रवका/न.क्र.२७०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३५९ दि. ०५ / १० / २०११

विषय : राष्ट्रीय/राज्य अपंग पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करणेबाबत.

......

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र.इडीडी/१०९१/१८००/ प्र.क्र.२६३/सुधार-२ दि.२१.१२.१९९३ नुसार शासकीय/निमशासकीय सेवेत असणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यास दोन व राज्य पुरस्कार प्राप्त झाल्यास एक आगाऊ वेतनवाढ देण्याची योजना राबविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील अपंग कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यास दोन व राज्य पुरस्कार प्राप्त झाल्यास एक आगाऊ वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव कंपनीचे विचाराधीन होता.

२. आता, व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचालन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील अपंग कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यास दोन व राज्य पुरस्कार प्राप्त झाल्यास एक आगाऊ वेतनवाढ खालील अटींच्या अधीन राहून देण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

१) सदर योजनेची अंमलबजावणी २२/०५/२००७ पासून करण्यात यावी. महावितरण कंपनीमधील राष्ट्रीय अपंग पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतनवाढी व राज्य अपंग पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना एक आगाऊ वेतनवाढ असा पुरस्कार जाहिर झाल्याच्या तारखेपासून मंजूर करण्यात यावी.

२) संपूर्ण सेवा कालावधीत सदर योजनेखाली मिळणाऱ्या आगाऊ वेतनवाढीची संख्या जास्तीत जास्त दोन असेल.

३) सदर आगाऊ वेतनवाढ मंजूर करताना पुरस्कार प्राप्त कर्मचारी यांच्या मूळ वेतनवाढीच्या दिनांकात बदल करून नये. जर पुरस्कार प्राप्त कर्मचारी पुरस्कार जाहीर झालेल्या दिवशी किरकोळ रजेव्यतिरीक्त अन्य रजेवर असेल तर त्याला सदर वेतनवाढ देताना तो जेंव्हा रजेवरून पुन्हा रुजू होईल त्या दिनांकापासून सदर वेतनवाढ देण्यात यावी.

४) त्याचप्रमाणे जे पुरस्कार प्राप्त कर्मचारी त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेवर पोहोचले असतील व त्यामुळे त्यांना दोन/एक आगाऊ वेतनवाढीचा लाभ प्रत्यक्षात मिळू शकणार नाही अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या त्यावेळच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या अगोदरच्या वेतनवाढीच्या ४८ (अठ्ठेचाळीस) पट रोख रक्कम देण्यात यावी. (उदा.पुरस्कार प्राप्त निम्नस्तर लिपिकाचे मूळ वेतन रु.२२४९५/- असल्यास त्याला निम्नस्तर लिपिक या पदाची सद्याची वेतनश्रेणी ९०२०-२२०-१०१२०-२९५-१३०७०-३२५-२२४९५ असल्यामुळे, कमाल वेतनवाढ रु.३२५ x ४८ = १५६००/-रूपये या प्रमाणे रोख रक्कम मिळेल.)

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(विजय भि. बागुल) ५/१०/२०११
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

*D:\O&M\Adm.Cir.-F.N.270-Addl.Increment to PHP.doc*
*05/10/11*